Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**प्रा. वायळ लक्ष्मण सखाराम,**
**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

**पर्यावरण शिक्षणाचा इतिहास :-**

1899 मध्ये वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक "पॅट्रिक गेडेस" यांनी "द आउटलूक टॉक" या नावाची संस्था स्थापन केली. पर्यावरण शिक्षण सुधारण्यासाठी शिक्षणातून जनजागृती करुन पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे यासाठी विद्यार्थ्यांमध्ये यामाध्यमातून निसर्ग, झाडे, प्राणी यांच्याविषयी प्रेम व आवड निर्माण करुन पर्यावरणाविषयी आवड, जिव्हाळा, अभिवृत्ती व आपले पणाची भावना निर्माण करता येईल असा विचार होता.

पहिले पर्यावरण शिक्षण देणारे पुस्तक 1907 मध्ये मॅन ॲड नेचर हे आहे. या पुस्तकात मानव मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करत आहे असा उल्लेख केलेला आहे. मानव निसर्गावर अवलंबून असून तो निसर्गाचा विध्वंस, नायनाट करत आहे असा आरोप सुध्दा या पुस्तकात केला आहे.

- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझेवल्ट यांनी राज्यपालांना विकास करतांना पर्यावरणाला धक्का बसणार नाहीत याची काळजी घ्यावी असे सूचविले.
- 1960 मध्ये प्रसार माध्यमाच्या माध्यमातून चर्चासत्रे, भाषणे प्रसिध्द केली.
- 1968 मध्ये शिक्षणशास्त्र विषयात पर्यावरण हा विषय समाविष्ट करुन युरोप व अमेरिकेच्या काही विद्यापीठांनी पर्यावरण शिक्षणाचा समावेश केला.
- 1970 मध्ये पॅरिस मध्ये पर्यावरण शिक्षण विषयक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी पहिली आंतरराष्ट्रीय परिषद भरली. या परिषदेत शालेय अभ्यासक्रमात भर द्यावा असे सूचविले तसेच पर्यावरण व मानवाचा एकमेकांशी कसा परस्परसंबंध आहे याबाबत माहिती देण्यात आली.
- 1972 स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) जागतिक पर्यावरण परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेते पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी ही मानवाचीच आहे असे जाहिर केले.

सर्व स्तरावर पर्यावरण शिक्षण देण्याची गरज आहे. या परिषदेचे फलित म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरण शिक्षण कार्यक्रम (UNEP) या विभागाने आंतरराष्ट्रीय पर्यावरण पर्यावरण शिक्षण कार्यक्रम (IEPP) अमलात आणला त्याचा प्रभाव जगातील पर्यावरण शिक्षणावर पडला.

ऑक्टोबर 1975 मध्ये बेलग्रेड येथे पर्यावरण शिक्षण कृती सत्रात पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित केली. तर 1997 च्या रशियाच्या जॉर्जिआ परिषदेत नैसर्गिक व माननिर्मित पर्यावरणाचा एकत्रित विचार व्हावा व पर्यावरण शिक्षणाची सुरुवात शाळापूर्व स्तरावर व अनौपचारिक होवून निरंतर चालावी असे म्हटले.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

मानवाच्या उत्क्रांतीच्या टप्प्यात गरजा कमी होत्या पशूसारखे जीवन त्यामुळे मानवाच्या कृती पर्यावरणाला हाणीकारक नव्हती.

विज्ञान व तंत्रज्ञानातील शोधांमुळे नैसर्गिक साधन सामग्रीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. उदा. लाकूड, खनिजपदार्थ, दगडी कोळसा, खनिजतेल यामुळे जल, भू, वायू व परिसरात प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. प्रदूषण थांबवणे मानवाच्य हाताबाहेर गेल्यामुळे मानवनिर्मित नैसर्गिक आपत्ती ओढवू शकते. यामुळे प्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची संकल्पना निर्माण झाली.

**पर्यावरण संकल्पनेचा उगम :**

पर्यावरण संकल्पनेचा उगम सामाजिक आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गरजांमधून झाली. आज पर्यावरणाची गुणवत्ता ढासाळत चालली आहे याला कारण जगात वाढणारी लोकसंख्या, औद्योगिकीकरण, वाढलेला उपभोक्तवाद, नैसर्गिक साधन संपत्तीचा जास्त वापर, मानवाची बेफिकीवृत्ती इत्यादीमुळे जल, वायू, ध्वनी, अंतराळ, भूमी इत्यादीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळेच मानवाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. म्हणून आज पर्यावरण संधारण करणे मानवापुढे हे एक आव्हानच आहे.

परिस्थितीनूरुप पुढे आलेली आव्हाने पेलण्यासाठी पर्यावरण शिक्षणातून विद्यार्थ्यांना, पाणी, इंधन, वृक्ष, हवा इ. वाचविण्याचे आणि योग्य वापर करण्याचे कृतीशील प्रशिक्षण दिले गेले तरच या आव्हानांना भविष्यात तोंड देण शक्य होणार आहे. आज जागतिक तापमानवाढी सारखी समस्या सर्व जगासमोर उभी आहे. समस्या निर्माण होण्या अगोदरच परिस्थिती नियंत्रणात आणली गेली तरच ही वसुंधरा (पृथ्वी) आपल्याला (मानवाला) सुरक्षिततेच कवच निर्माण करुन देईल. कारण सजीव सृष्टीतील एकमेकांवर अवलंबून असणारे हवा, पाणी, माती, वनस्पती, सूर्यप्रकाश व प्राणी हे घटक पैसे खर्च करुन निर्माण करता येत नाहीत. त्यांच अस्तित्व टिकविणे हे मानवासमोरील एक मोठे आव्हान आहे. यामुळेच पर्यावरण शिक्षण विषयाला शाळा, महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात योग्य स्थान दिले गेले आहे.

नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर व जतन करण्यासाठीचे शिक्षण, संस्कार बाल वयातच करणे गरजेचे आहे.

पर्यावरण शिक्षणात पुढील घटकांचा समावेश होतो.

1) परिसंस्था, 2) औद्योगिकरण, 3) वन्यजीवन, 4) मानवीजीवन, 5) हवामान, 6) प्रदूषण, 7) शहरीकरण, 8) आधुनिक तंत्रज्ञान/ माहिती, 9) भौगोलिक स्थिती, 10) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंध, 11) नैतिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, 12) मानसिक आरोग्य, 13) लोकसंख्या विस्फोट, 14) आपत्ती व्यवस्थापन, 15) नैसर्गिक संपदा, 16) जैविक विविधता, 17) संरक्षण विषयक कायदे इ.

**पर्यावरण शिक्षण :**

पर्यावरणाशी संबंधित असलेले शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

पर्यावरणाचे आकलन, पर्यावरणाचा मानवासह इतर सजींवावर होणारा परिणाम विषयक समस्या त्यांचे निराकरण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

पर्यावरणातील विविध घटकांचे विश्लेषण करुन त्यांचा परस्परसंबंध विशद करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

पर्यावरणाचे घटक व समस्या यांचे आकलन होवून त्याविषयी जाणीव जागृती निर्माण करणे, पर्यावरणाचे संवर्धनासाठी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारी अध्यापन प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

**पर्यावरणाचे महत्त्व :**

1. निसर्गाने सर्व मूलभुत बाबी शुध्द स्वरुपात मानवाला दिलेल्या आहेत. परंतु मानव त्यात प्रदूषण घडवत आहे. म्हणून आज रस्त्यावर, चौकात उभ्या असलेल्या पोलिसांना किंवा रस्त्याने प्रवास करणाऱ्या व्यक्तींना चाळणीने हवा घ्यावी लागते. सर्व सामान्य माणसाला पाण्यात औषधे टाकून पाणी प्यावे लागते. निसर्गाने मोफत दिलेले पाणी बाटलीत बंद करुन 15 ते 20 रुपयाला विकत घ्यावे लागते. चांगल्या पाण्यात मानवाने गावातील, शहरातील, कारखान्यातील गटारीचे पाणी सोडून अशुध्द केले आहे. म्हणून पुन्हा पुन्हा पाणी शुध्द करुन विकत घ्यावे लागते. म्हणून पर्यावरण रक्षणासाठी पर्यावरण शिक्षण देणे गरजेचे आहे.
2. साखर कारखाने, पोलाद कारखाने, विमानांचा आवाज, अवजड वाहानांचा आवाज यामुळे ध्वनी प्रदूषण होवून मानवाची श्रवणेंद्रिय निकामी होत आहेत. शांतता भंग होत चालली आहे, हे टाळण्यासाठी पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे.
3. ओझन वायूचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे मानवाला अतिनील किरणांमुळे स्किन कॅन्सर सारखे आजार होत आहेत हे टाळण्यासाठी ओझन वायूचे महत्त्व विद्यार्थ्यांना व समाजाला पटवून देण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.
4. अनेक प्रकारची जैवविविधता, अन्न शृंखला नष्ट होत आहेत. त्यामुळे अनेक प्रजाती समूळ नष्ट झाल्या आहेत. त्याचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो हे टाळण्यासाठी पर्यावरण शिक्षण गरजेचे आहे.
5. पर्यावरणीय प्रदूषणामुळे पर्यावरणातील मृदावरण, जलावरण व वातावरण प्रदूषित होत आहेत. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज व आवश्यकता आहे.
6. पर्यावरणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन समाजाला निर्माण करण्यासाठी पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे.
7. पुढील पिढीला नैसर्गिक साधन सामग्रीचा पुरवठा होण्यासाठी व त्याचा वापर जपून करण्यासाठी पर्यावरण विषयक जनजागृती करुन पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**संदर्भ ग्रंथ:**

1. सारंग सुभाषचंद्र, 1999, **पर्यावरण भूगोल,** विद्या प्रकाशन, नागपूर.
2. कुलकर्णी डी.आर., 2007, **पर्यावरण शिक्षण,** विद्या प्रकाशन, नागपूर.
3. भांडारकर के.म., 2007, **पर्यावरण शिक्षण,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
4. सावंत प्रकाश, 2006, **पर्यावरण शिक्षण,** फडके पब्लिकेशन, कोल्हापूर.